आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१० एप्रिल २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याचा प्रचार शिगेला

- प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांची आज नागपूरमधे प्रचारसभा

- राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ९ उमेदवार जाहीर

- राज्यसभेच्या नवनिर्वाचित १० सदस्यांचा शपथविधी

**आणि**

- येत्या २ दिवसात देशाच्या विविध भागात वादळी वारे आणि गारपीटीचा हवामानविभागाचा अंदाज / महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशात ऑरेंज अलर्ट जारी

**<><><><><><>**

प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांची आज महाराष्ट्रात नागपूर जिल्ह्यात कन्हान इथं प्रचारसभा होणार आहे. रामटेक लोकसभा मतदार संघातून शिवसेना शिंदे गटाचे राजू पारवे हे महायुतीचे उमेदवार आहेत. नागपूरमधून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी लोकसभा निवडणूक लढवत आहेत. महाआघाडीतर्फे काँग्रेसचे श्यामकुमार बर्वे, रामटेकमधले आणि विकास ठाकरे, नागपूरचे उमेदवार आहेत. वंचित बहुजन आघाडीनं दोन्ही ठिकाणी काँग्रेसच्या उमेदवारांना पाठिंबा दिला आहे. दरम्यान, बहुजन समाज पार्टीच्या अध्यक्ष मायावती उत्तर नागपूरमधल्या इंदोरा इथं उद्या जाहीर सभा घेतील. बसपातर्फे नागपूरमधून योगेश

लांजेवार आणि रामटेकमधून संदीप मेश्राम निवडणुकीच्या रिंगणात आहेत. नागपूर आणि रामटेकसह विदर्भातल्या पाच लोकसभा मतदारसंघात येत्या 19 एप्रिल रोजी मतदान होणार आहे.

प्रधानमंत्री मोदी आज तमिळनाडूमधे प्रचारसभा घेत असून रोड शो करणार आहेत. द्रमुक पक्ष जनतेच्या प्रश्नांविषयी संवेदनशील नाही, तसंच घोटाळेबाज आहे, अशी टीका त्यांनी वेल्लोर इथल्या सभेत केली.

**<><><><><><>**

लोकसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं एकूण ९ उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत. त्यानुसार वर्धा मतदारसंघात अमर काळे, दिंडोरीत भास्कर भगरे, बारामतीत सुप्रिया सुळे, शिरुरमधे अमोल कोल्हे, अहमदनगर मधे निलेश लंके, बीडमधे बजरंग सोनावणे, भिंवडीत सुरेश म्हात्रे हे उमेदवार निवडणूक लढवणार आहेत. सातारा मतदार संघात शशिकांत शिंदे तर रावेरमधे श्रीराम पाटील शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार असतील. महाराष्ट्रातल्या जागावाटपानुसार राष्ट्रवादी काँगेस शरदचंद्र पवार पक्षाला १० जागा मिळाल्या असून, माढ्याचा उमेदवार अजून जाहीर व्हायचा आहे.

**<><><><><><>**

लोकसभा निवडणुकीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवून बिनशर्त पाठिंबा जाहीर केल्याबद्दल शिवसेना नेते आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज ठाकरे यांचे आभार मानले आहेत.

**नागपूर** इथं आज ते वार्ताहरांशी बोलत होते. विधानसभेच्या निवडणुकीवेळी मनसे बद्दल काय भूमिका असेल, असं माध्यम प्रतिनिधींनी विचारलं असता, वेळ येईल तेव्हा पाहू, असं उत्तर, शिंदे य़ांनी दिलं. उपमुख्यमंत्री आणि भाजपा नेते

देवेंद्र फडणवीस यांनी देखील  महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचे आभार मानले.

देशाला चांगल्या खंबीर नेतृत्वाची गरज आहे असं  सांगत भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी यांना आणि तेही फक्त नरेंद्र मोदींसाठी, मनसे बिनशर्त पाठिंबा देत असल्याचं मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी काल मुंबईत शिवाजी पार्क मैदानावरच्या गुढी पाडवा मेळाव्यात जाहीर केलं. त्याचवेळी मनसे कार्यकर्त्यांनी आगामी विधानसभा निवडणुकांच्या तयारीला लागावं असंही त्यांनी सांगितलं. त्यासाठी आपण लवकरच राज्याचा दौरा करणार असल्याचंही राज ठाकरे यांनी यावेळी जाहीर केलं.

**<><><><><><>**

उत्तराखंडच्या विकासासाठी काम न केल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी कॉंग्रेसला जबाबदार धरलं आहे. अमर उजाला या हिंदी दैनिकला मुलाखत देताना त्यांनी  उत्तरखंडला देवभूमी तर स्वतःला देवभूमीचा सेवक असं संबोधलं आहे. उत्तराखंड हा भाग वर्षानुवर्षं दुर्लक्षित राहिला आहे. कारण सत्ताधाऱ्यांनी या प्रदेशाचा विकास फार मनावर घेतला नाही, असं ते म्हणाले. उत्तराखंडमध्ये नरेंद्र मोदी यांनी बराच काळ आध्यात्मिक ज्ञान प्राप्तीसाठी दिला होता. तेव्हा ते भारतीय जनता पक्षाचं काम करत असल्यानं या डोंगरदऱ्यांमधल्या जनतेचे प्रश्न त्यांच्या परिचयाचे आहेत, असंही ते म्हणाले.

**<><><><><><>**

आगामी लोकसभा निवडणूक हा दोन विचारधारांमधला लढा असल्याचं मत आज काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी यांनी व्यक्त केलं. एका बाजूला काँग्रेसनं भारताला नेहमीच एकसंध ठेवलं तर दुसऱ्या बाजूनं कायम जनतेत विभाजन केलं गेलं, असं

त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. देशात फूट पाडायचा प्रयत्न करणाऱ्या शक्तींशी कोणी हातमिळवणी केली तसंच कोणी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आणि एकतेसाठी लढा दिला याचा साक्षीदार इतिहास असल्याचं त्यांनी सांगितलं.

भारत छोडो आंदोलनादरम्यान काँग्रेसचे अनेक नेते तुरुंगात होते असंही त्यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

आगामी लोकसभा आणि आंध्रप्रदेश विधानसभेच्या निवडणुकीसाठी काँग्रेसनं काल उमेदवारांची यादी जाहीर केली. विशाखापट्टम इथून पुलुसू सत्यनारायण रेड्डी आणि तिरुपती लोकसभा मतदारसंघातून डॉ. चिंता मोहन यांना काँग्रेसनं उमेदवारी दिली आहे. काँग्रेस पक्षानं आंध्रप्रदेश विधानसभेसाठी बारा आणि लोकसभेसाठी सहा उमेदवारांची यादी जाहीर केली आहे.

**<><><><><>**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण यवतमाळ - वाशिम लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

राज्यसभेच्या दहा नवनिर्वाचित सदस्यांनी आज शपथ घेतली. नवी दिल्लीच्या संसद भवनात उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी त्यांना शपथ दिली.

यामध्ये भाजपचे मयंकभाई जयदेवभाई नायक, शिवसेनेचे मिलिंद मुरली देवरा, काँग्रेसच्या रेणुका चौधरी, समाजवादी पक्षाचे रामजी लाल सुमन आणि तृणमूल काँग्रेसच्या  सागरिका घोष यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

जागतिक होमिओपॅथी दिना निमित्त नवी  दिल्ली इथं आज  राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते एका होमिओपॅथिक परिसंवादाचं उद्घाटन झालं. ‘संशोधनाचं सक्षमीकरण आणि प्राविण्य वाढवणं’ ही या परिसंवादाची संकल्पना आहे. दोन दिवस चालणाऱ्या या परिसंवादात होमिओपॅथीच्या संशोधनासाठी प्रगत तंत्रं, औषध मानकीकरण आणि मूलभूत संशोधन आदी विषयावर आधारित विविध चर्चासत्रं आणि मार्गदर्शनपर भाषणं होणार आहेत.

**<><><><><>**

चैत्र नवरात्राला कालपासून सुरुवात झाली असून त्या पार्श्वभूमीवर देशातल्या सात शक्तिपीठांवर येत्या १७  एप्रिल पर्यंत  संगीत नाटक अकादमी तर्फे 'शक्ती- संगीत आणि नृत्य महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. गुवाहाटी इथल्या कामाख्या मंदिर इथं या महोत्सवाचं काल उद्घाटन झालं. महाराष्ट्रात  कोल्हापूरच्या महालक्ष्मी मंदिरात आज आणि उद्या दोन दिवस या महोत्सवानिमित्त विविध सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. देशातल्या रंगमंचीय कलाप्रकारांचं  संवर्धन व्हावं, त्यावर संशोधन व्हावं, संगीत, नृत्य, नाट्य, लोककला, आदिवासी कलांना तसंच लोककलाकारांना प्रोत्साहन देण्याचा या महोत्सवाचा प्रमुख उद्देश आहे. हिमाचल प्रदेशात  कांगडा इथलं 'ज्वालामुखी मंदिर', त्रिपुरामधल्या उदयपूरचं 'त्रिपुरसुंदरी' मंदिर, गुजरात राज्यातल्या बनासकांठा इथलं  'अंबाजी मंदिर', झारखंड राज्यातल्या देवघर इथल्या ‘जलदुर्गा

शक्तिपीठ’ इथं हा महोत्सव साजरा केला जाईल.  मध्यप्रदेशातल्या उज्जैनमधल्या ‘माँ हरसिद्धी मंदिर’ या शक्तिपीठावर या महोत्सवाचा समारोप होईल, अशी माहिती पत्र सूचना कार्यलयानं दिली आहे.

**<><><><><>**

ईद-उल-फित्र, अर्थात रमजान ईदनिमित्त राज्यपाल रमेश बैस यांनी राज्यातल्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. ही ईद सर्वांच्या जीवनात आनंद, उत्तम आरोग्य आणि संपन्नता घेऊन येवो अशी प्रार्थना राज्यपालांनी शुभेच्छा संदेशात व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

आयपीएल टिट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज जयपूर इथं राजस्थान रॉयल्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात सामना होणार आहे. जयपूर इथं संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

**<><><><><>**

हवामान विभागानं आज महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशाच्या काही भागांसाठी ऑरेंज अलर्ट दिला असून, मध्य प्रदेश आणि विदर्भात काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता आहे.

येत्या शनिवारपर्यंत महाराष्ट्र, मध्यप्रदेश, छत्तीसगड, पश्चिम बंगालमधला गंगेच्या खोऱ्यातला भाग, झारखंड, ओदिशा, बिहार आणि अंदमान निकोबारमधे विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. तेलंगण आणि केरळमधे पुढचे सात दिवस विजांचा कडकडाट, ढगांचा गडगडाट आणि वादळी वाऱ्यासह

पाऊस पडेल, असा अंदाजही हवामान विभागानं व्यक्त केला आहे. ईशान्य भारतात पुढचे चार दिवस तुरळक ठिकाणी पाऊस आणि बर्फवृष्टी होण्याची शक्यता आहे.

//<><><><><><>//

आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१० एप्रिल २०२४ - बुधवार